|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

# श्री मंगळागौरी

## व्रत कथा आणि पूजा विधी



तुकाराम बुक डेपो, मुंबई-४.

॥ॐ॥

पतीच्या आयुष्य वृद्धीसाठी म्हणजेच
स्वत:च्या अखंड सौभाग्यासाठी
श्रावण महिन्यातील दर मंगळवारी
सुवासिनींनी करावयाचे प्रभावी व्रत

# श्रीमंगळागौरी
# व्रतकथा आणि पूजाविधी

**(कहाणी, आरत्या, उखाणे, गाणी यांसह)**

संपादक :
विद्यानंद भारती

Astrologers

**किंमत ३० रुपये**

Proprietor

**तुकाराम बुक डेपो**
माधवबाग, मुंबई ४००००४ * दूरध्वनी : २२४२१६८९

# मंगळागौरीचा सण

श्रावण महिना आला की मुलींना, स्त्रियांना, व विशेषत: सुवासिनी स्त्रियांना अतिशय उत्साह वाटू लागतो. ते सण, ती व्रतवैकल्ये, ते उपवास यांनी हा महिना अगदी भरून गेलेला असल्याने त्यांना उसंत अशी मिळतच नाही. त्यांतल्यात्यात मंगळागौरीच्या सणाकडे नवविवाहित मुली आणि प्रौढ स्त्रिया अगदी डोळे लावून बसलेल्या असतात. कोणाला किती मुली पूजेला मिळाल्या याचीच चर्चा सर्व जणी आपापसांत करताना दिसून येतात. लहान मुलींना शाळेला सुट्टी मिळते आणि रात्रभर खेळावयास मिळते. त्यामुळे त्यानाही मंगळागौरीच्या सणाबद्दल खूपच ओढ असते.

सर्वांचा आनंद पाहून घरातील पुरुष मंडळींना साहजिकच मोठे समाधान वाटते. असा हा फार लोकप्रिय सण आहे.

**विद्यानंद भारती**


प्रकाशक : महेंद्र मधुकर कस्तुर
**तुकाराम बुक डेपो**
९७, माधवबाग, सी. पी. टँक,
मुंबई-४०० ००४.
दूरध्वनी : २२४२१६८९

अक्षरजुळणी :
अक्षय फोटोटाइपसेटर्स, ठाणे-१

मुद्रक :
शिवानी प्रिंटर्स, मुंबई-४

पहिली आवृत्ती :
जुलै २०१२




# श्रीमंगळागौरी पूजन (माहिती)

विवाह झाल्यावर सुवासिनींनी पहिली पाच वर्षे श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी मंगळागौरी व्रत आणि पूजा करण्याची पद्धत आहे. पाचव्या वर्षाच्या शेवटच्या मंगळवारी व्रताचे उद्यापन करावे.

शहरात जागा लहान असल्यामुळे हौसेने हॉल घेऊनही मंगळागौरी केली जाते. या दिवशी आजूबाजूच्या ओळखीच्या, नात्यातील लग्न झालेल्या सुवासिनींना वसोळी म्हणून बोलावितात. वसोळी म्हणजे जिच्या लग्नाला पाच वर्ष झालेली नाहीत व जिचे मंगळागौरीचे व्रत पूर्ण व्हावयचे आहे अशी सुवासिनी. अशा सर्व वसोळ्या जेथे मंगळागौरीची पूजा असेल तेथे एकत्र जमतात. प्रत्येक वसोळी आपापल्या घरून पंचामृती पूजेची सर्व तयारी करून तबकामध्ये सजवून आणते. शक्य झाल्यास आपल्या घरातील देवीची मूर्ती सोबत आणते. गुरुजी सांगतील त्या प्रमाणे किंवा या पुस्तकात दिल्याप्रमाणे यथासांग पूजा करावी. दुसरे कोणतेही विचार मनात न आणता शांत चित्ताने पूजा करावी. एकमेकींनी एकमेकींशी इतर काहीही बोलू नये. शक्यतो सकाळी अकरा वाजेपर्यंत पूर्ण होईल अशा बेताने पूजा करावी. व्रताच्या दिवशी सुवासिनींनी दिवसभर उपवास करावा असा नियम नाही.

प्रथम चौरंगावर तांदूळ ठेवून त्यामध्ये अन्नपूर्णा देवी बसवून तिची षोडशोपचारे पूजा करावयाची असते. देवीसाठी बांगड्या, मंगळसूत्र, जोडवी, विरवली, फुलांची वेणी, पाटा, वरवंटा वगैरे सोभाग्यलेणी करावयाची असतात. कणकेमध्ये थोडीशी हळद घालून ते पीठ दुधामध्ये भिजवून त्याची ही लेणी करावयाची असतात. म्हणजेच सौभाग्य अलंकारांचे ते प्रतीक होय. तसेच या पिठाचा पाटा-वरवंटा करून त्यावर देवी बसवावयाची असते. गौरीच्या सभोवती फुलांची सजावट करावयाची असते. श्रावणामध्ये सर्व प्रकारच्या फुलांना बहर

आलेला असतो. निरनिराळ्या फुलांच्या माळा सजावटीसाठी खूपच उपयोगी पडतात.

सर्व पूजा आटोपल्यावर मंगळागौरीची कहाणी वाचून नंतर आरती करावयाची व त्यानंतर महानैवेद्य दाखवयाचा असतो. जेवणामध्ये पाच प्रकारची पक्वान्ने करावयाची असतात. तसेच मुगाची डाळ व तांदूळ यांची अळणी खिचडी- म्हणजे मीठ न घालता खिचडी करावयाची असते व ती प्रत्येकीने थोडी तरी प्रसाद म्हणून खावयाची असते.

दुपारी जेवताना बोलू नये. प्रत्येक सुवासिनीच्या ताटापुढे रांगोळी काढावी. जेवणाच्या वेळी प्रत्येकीने तुळशीचे पान जवळ ठेवावे. जेवण झाल्यावर तोंड धुऊन तुळशीचे पान खावे, नंतर बोलावयास सुरुवात करावी. तसेच प्रत्येकीला विडा, दक्षिणा आणि काहीतरी भेटवस्तू देण्याची पद्धत आहे. आईनेही मुलीला साडी देऊन ओटी भरावी. सासूने साडी द्यावी किंवा दागिना द्यावा.

संध्याकाळी बायकांना हळदी-कुंकू आणि फराळाकरिता बोलवावे. हळद-कुंकू लावून हातावर विड्याची पाने, सुपारी व थोडी साखर किंवा साखर-खोबरे द्यावे. गव्हाने सुवासिनींच्या ओट्या भराव्यात. प्रसाद म्हणून सुवासिनींना व कुमारिकांना या पुस्तकाच्या प्रती द्याव्या म्हणजे आईचा महिमा त्यांनाही कळेल व त्याचे पुण्य आपणांला लाभेल.

भाजणीचे वडे, दही-चटणी, कोशिंबीर, मसालेभात, मटकीची उसळ, पुरणपोळी वगैरे पदार्थ प्रामुख्याने फराळासाठी करण्याची पद्धत आहे. रात्री फराळ झाल्यावर मंगळागौरीची आरती करून जागरण करावे. रात्रभर सर्व बायका, मुलींनी मंगळागौरीचे खेळ खेळावे.

मंगळागौरी पूजनाच्या दिवशी जर सुवासिनीचा उपवास असेल, तर त्या मंगळवारपुरता उपवास सोडला तरी चालतो. या खेळांमध्ये फुगड्या, झिम्मा, कोंबडा, बसफुगडी, सासू-सुनेचे भांडण, आळुंकी-सांळुंकी, दंडफुगडी, किस बाई किस, आगोटा-फागोटा, दिंड, पाणी



पाणी पाटाचं, सुपाऱ्या, आज कोण वार, गिरकी-झिम्मा, गाठोडं जातं, बेडूकउड्या, उंच उड्या, लाटणे, सूप इत्यादी खेळ मुख्यत्वेकरून खेळले जातात. फुगड्या खेळताना एकमेकींना निरनिराळे उखाणे घालतात. या दिवशी प्रत्येकीला 'नाव घेण्याचा' तर खूपच आग्रह केला जातो व त्याही आपल्या पतीचे नाव उखाण्यामध्ये गुंफून सुंदरसुंदर उखाणे घेतात. (या पुस्तकात शेवटी फुगड्या, उखाणे व गाणी दिली आहेत.) या सर्व कार्यक्रमामुळे आपणही जागे राहतो व आपल्या हातून देवीची सेवा होते.

रात्रभर जागरण करून पहाटे स्त्रियांनी स्नान वगैरे करून मंगळागौरीला दहीभाताचा नैवेद्य दाखवून आरती म्हणावी व पुढील मंत्र म्हणून:

**यान्तु देवगण: सर्वे पूजामादाय पार्थिवीम्।**
**इष्टकामप्रसिद्ध्यर्थ पुनरागमनाय च॥**

मंगळागौरीला अक्षता वाहून तिला हलवल्यासारखे करावे. म्हणजे कळवावी नंतर (विसर्जनानंतर) आतील देवीची मूर्ती, पैसे, सुपारी, इतर काही खाद्यपदार्थ असल्यास काढून घ्यावेत व बाकी सर्व निर्माल्य म्हणून नदीत अथवा समुद्रात विसर्जन करावे.

## मंगळागौरीचे व्रत-उद्यापन

मंगळागौरीची पूजा पाच वर्षे करतात. म्हणजे चार वर्षे पूजा करून पाचव्या वर्षी या व्रताची सांगता करावयाची असते. त्यास "उद्यापन" असे म्हणतात. हे व्रत आईने मुलीला "सौभाग्य व्रत" म्हणून दिलेले असते. (म्हणूनच बहुतेक पहिल्या वर्षीचा पहिला मंगळवार आईकडे पूजा असते.)

**उद्यापन:** उद्यापन करावयाचे झाल्यास आपल्या उद्यापनाबरोबर दुसऱ्या कोणाची तरी मंगळागौरी करावी लागते. त्या मंगळागौरीबरोबर आपल्या व्रताचे उद्यापन करावे. आदले दिवशी म्हणजे सोमवारी सकाळी

भटजींना बोलवावे, तांब्याच्या कलशात पाणी, अक्षता, आंब्याची डाहळी ठेवून कलशाची पूजा करावी. मंगळवारी पूजेसाठी पुण्याहवाचन करण्याकरिता, होमहवन करण्याकरिता भटजींना बोलवावे. वरील सर्व गोष्टी भटजी करवून घेतात. ज्या ठिकाणी होमहवन करावयाचे त्या ठिकाणीच द्यावयाचे वाण वगैरे ठेवावे. हे वाण आई-वडिलांना द्यावयाचे असते. जर आई-वडील हयात नसतील, तर भाऊ-भावजयीला द्यायचे असते. कारण हे वाण आपल्या माहेरच्या वंशात गेले पाहिजे असे आहे.

**उद्यापनाची तयारी :** काजळ, दोन हिरव्या बांगड्या, गळेसरी वगैरे सौभाग्यवाण आणि तांब्याच्या तपेल्यात सोन्याचा लहानसा नाग घालून त्याला दादरा बांधवा व लाडू असे वाण द्यावे. वडिलांना उपरणे, शर्ट, धोतर, टोपी असे द्यावे. आईला मणीमंगळसूत्र व जोडवी द्यावीत. मंगळागौरीच्या मुलींना खण किंवा कापड द्यावे. जिने व्रताचे उद्यापन केलेले असते तिला मणीमंगळसूत्र, जोडवी, पातळ, खण द्यावा.

## पूजेची तयारी

पूजा ज्या ठिकाणी करावयाची ती जागा गाईच्या शेणाने स्वच्छ सारवून घ्यावी, फरशी असेल तर स्वच्छ पुसावी त्यावर चौरंग अगर पाट ठेवावा. चौरंगाखाली रांगोळीने स्वस्तिक काढून भोवताली सुशोभित रांगोळी घालावी त्यावर गुलाल घालावा. जेथे पूजेस बसावयाचे, त्या पाटाभोवती रांगोळी काढावी. पूजा 'सांगणारे' अगर 'सांगणारी' असेल त्यांच्या पाटाभोवती रांगोळी काढावी. चौरंगाच्या चारी बाजूला केळीचे खुंट अगर कर्दळीचे खुंट लावावेत. फुलांच्या माळी सोडाव्यात, निरनिराळ्या पानाफुलांची सुंदर आरास करावी. पूर्वेकडे तोंड करून पूजेला बसावे. नेसण्याचे वस्त्र रेशमी असल्यास उत्तम, नसल्यास धुतवस्त्र आणि शक्यतो पूर्णवस्त्र म्हणजे नऊवारी असावी. शक्य नसल्यास नित्याचे.



पूजेपूर्वी घरातील देवांची पूजा आपल्या यजमानांस करण्यास सांगावी. त्यानंतरच मंगळागौरीची पूजा करावी. पूजेपूर्वी घरातील सर्व वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार करावा. ब्राह्मण गुरुजींना नमस्कार करावा. मगच पूजेला बसावे.

प्रत्येक मंगळवारी सायंकाळी आरती करावी, फराळ करावा व विविध प्रकारचे खेळ करून जागरण करावे. या खेळांमुळे सर्वांग सुंदर व्यायामही होतो. क्रीडाकौशल्य प्रकट करता येते. उखाणे घेण्यामुळे समयसूचकता, भाषा कौशल्य प्रकट होते.

## सूचना

१. फुले किंवा पूजाद्रव्य देवावर फेकू किंवा उडवू नये.
२. विडा ठेवताना पाने उताणी, देठ देवाकडे व अग्रे आपल्याकडे असावीत. नारळ ठेवताना त्याची शिखा तसेच फळे ठेवताना त्यांचे देठ देवाकडे असावे.
३. करंगळीजवळच्या बोटाने गंध लावावे.
४. पूजा चालू असताना आपापसांत बोलू नये.
५. पूजा करताना दुसरीकडे लक्ष असू नये.
६. दुसऱ्या दिवशी उत्तरपूजा होईपर्यंत तेलाचा दिवा सतत लावलेला असावा.
७. एका फुलपात्रात पाणी, गंध, अक्षता असे अर्घ्य तयार करून ते चौरंगावर ठेवावे. अर्घ्य वाहते वेळी सर्वांनी त्या अर्घ्याचा उपयोग करावा.
८. प्रत्येकीने चार विडे चौरंगाखाली मांडून त्यावर दक्षिणा, सुपारी, खारीक, बदाम व फळे मांडून ठेवावीत.
९. सर्व पूजेचे साहित्य निरनिराळ्या तबकात घेऊन पूजेजवळ ठेवावे. म्हणजे पूजा करताना सारखे उठावे लागणार नाही.

# प्रार्थना

मंगळागौरीची पूजा झाल्यावर देवीला हात जोडून प्रार्थना करावी- 'हे मंगळागौरी माते, आपली पूजा कशी करावी, कोणता उपचार करावा केव्हा, कसा वाहावा, हे आम्हांला समजत नाही. तू आमची आई आहेस. जे अधिक-उणे असेल ते पूर्ण करून घ्यावे. आमच्या हातून अजाणतेपणाने घडलेल्या अपराधाची क्षमा करून आमचे सपरिवार रक्षण करावे अशी प्रार्थना आहे. आमची संकटे दूर व्हावीत, आम्हाला उत्तम आरोग्य, धनधान्य, संतती, सुख, समाधान लाभो. आमच्यावर तुझी कृपादृष्टी असू द्यावी!

नंतर आपल्या मनातील इच्छा सांगावी, ती पूर्ण करण्यास तिची प्रार्थना करावी.





॥ श्री गणेशाय नमः ॥

# मंगलागौरी पूजा

**मंगलागौरी व्रताचा शास्त्रार्थ-** हे व्रत विवाह झालेल्या स्त्रियांनी पतीच्या आयुष्यवृद्धीसाठी पहिली पाच वर्षे श्रावण मासांतील प्रत्येक मंगळवारी करावे. मंगलस्नान करून मंगलागौरी देवीचे षोडशोपचाराने पूजन करावे व कणकेच्या (गव्हाच्या पिठाच्या) सोळा दिव्यांनी आरती करावी. ब्राह्मण, सुवासिनी व माता यांना सौभाग्यवाण द्यावे. आरतीकरिता केलेले दिवे प्रसाद म्हणून भक्षण करावे व अळणी अन्न खावे.

## ॥ पूजासाहित्य ॥

हळद, कुंकू, गुलाल, रांगोळी, फुले, दूर्वा, बेल, तुळशी, उदबत्ती, कापूर, निरांजन, काडवाती, कापसाची वस्त्रे, विड्याची पाने १२, सुपाऱ्या २५, नारळ २, गूळ, खोबरे, खारका ५, बदाम ५, पेरू २, केळी २, वासाचे तेल, पंचामृत (दूध, दही, तूप, मध, साखर), तीळ, तांदूळ, गहू, मुगाची डाळ, जिरे वगैरे धान्ये व खुर्दा. **पत्री:-** (१) चमेलीची पाने, (२) मक्याची पाने, (३) बेलाची पाने, (४) बोरीची पाने, (५) धोत्र्याची पाने, (६) तुळशीची पाने (७) शमीची पाने, (८) आघाड्याची पाने, (९) डोरलीची पाने, (१०) कण्हेरीची पाने,

(११) रुईची पाने, (१२) अर्जुनसादड्याची पाने, (१३) विष्णुकांताची पाने, (१४) जाईची पाने, (१५) शेवंतीची पाने, (१६) डाळिंबीची पाने.

## ।। अथ पूजाप्रारंभ ।।

प्रथम आपल्या इष्ट देवतांना हळदकुंकू वाहून देवापुढे विडा (विड्याची पाने २, त्यावर एक सुपारी) ठेवून देवाला नमस्कार करावा. गुरुर्जींना म्हणजे उपाध्यायांना व वडील मंडळींना नमस्कार करून आसनावर बसावे. नंतर पूजेला सुरुवात करावी.

**द्विराचम्य** : पुढे दिलेल्या चोवीस नावांपैकी पहिल्या तीन नावांचा उच्चार करून प्रत्येक नावाच्या शेवटी संध्येच्या पळीने उजव्या हातावर पाणी घेऊन प्राशन करावे. चौथ्या नावाचा उच्चार करून संधेच्या पळीने उजव्या हातावर पाणी घेऊन उदक सोडावे. याप्रमाणे दोन वेळा करावे.

**(१) केशवाय नम: (२) नारायणाय नम: (३) माधवाय नम: (४) गोविंदाय नम: (५) विष्णवे नम: (६) मधुसूदनाय नम: (७) त्रिविक्रमाय नम: (८) वामनाय नम: (९) श्रीधराय नम: (१०) हृषीकेशाय नम: (११) पद्मनाभाय नम: (१२) दामोदराय नम: (१३) संकर्षणाय नम: (१४) वासुदेवाय नम: (१५) प्रद्युम्नाय नम: (१६) अनिरुद्धाय नम:**



**(१७) पुरुषोत्तमाय नम: (१८) अधोक्षजाय नम: (१९) नारसिंहाय नम: (२०) अच्युताय नम: (२१) जनार्दनाय नम: (२२) उपेंद्राय नम: (२३) हरये नम: (२४) श्रीकृष्णाय नम:।।**

येथून पुढे ध्यान करावे, ते असे:- हातांत अक्षता घेऊन दोन्ही हात जोडावे व आपली दृष्टी आपल्यासमोरील देवाकडे लावावी.

**श्रीमन्महागणधिपतये नम:। इष्टदेवताभ्यो नम:। कुलदेवताभ्यो नम:। ग्रामदेवताभ्यो नम:। स्थानदेवताभ्यो नम:। वास्तुदेवताभ्यो नम:। मातापितृभ्यो नम:। श्रीलक्ष्मीनारायणाभ्यां नम:। श्रीउमामहेश्वराभ्यां नम:। सर्वेभ्यो देवभ्यो नम:। सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमो नम:। निर्विघ्नमस्तु। सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णक:। लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिप:। धूम्रकेतुर्गणाध्यक्षो भालचंद्रो गजानन:। द्वादशैतानि य: पठेत् शृणुयादपि। विद्यारंभे विवाहे च प्रवेशे निर्गमे तथा। संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते। शुक्लांबरधरं देवं शशिवर्ण चतुर्भुजम्। प्रसन्नवदनं ध्यायेत् सर्वविघ्नपशांतये। सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके। शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोस्तु ते। सर्वदा सर्वकार्येषु नास्ति तेषाममंगलम्।**

येषां हृदिस्थो भगवान् मंगलायतनं हरि:। तदेव लग्नं सुदिनं ताराबलं चंद्रबलं तदेव। विद्याबलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेंघ्रियुगं स्मरामि। लागस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजय:। येषामिंदीवरश्यामो हृदयस्थो जनार्दन:। विनायकं गुरुं भानुं ब्रह्मविष्णुमहेश्वरान्। सरस्वती प्रणौम्यादौ सर्वकार्यार्थसिद्धये। अभीप्सितार्थसिद्ध्यर्थं पूजितो य: सुरासुरै:। सर्वविघ्नहरस्तस्मै गणाधिपतये नम:। सर्वेष्वारब्धकार्येषु त्रयस्त्रिभुवनेश्वरा:। देवा दिशंतु न: सिद्धिंब्रह्मशान-जनार्दना:। श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवंतमानस्य अद्य ब्राह्मणो द्वितीये परार्धे विष्णुपदे श्रीश्वेतवाराहकल्पे वैवस्वतमन्वंतरे कलियुगे प्रथमचरणे भरतवर्षे भरतखंडे जंबुद्वीपे दंडकारण्ये देशे गोदावर्या: दक्षिणे तीरे शालिवाहनशके अमुक नाम संवत्सरे दक्षिणायने वर्षाऋतौ श्रावणे मास अमुक पक्षे अमुक तिथौ अमुक वासरे अमुक दिवसनक्षत्रे अमुक स्थिते वर्तमाने चंद्रे अमुक स्थिते श्रीसूर्ये अमुक स्थिते श्रीदेवगुरौ शेषेषु ग्रहेषु यथायथं राशिस्थानस्थितेषु सत्सु शुभनामयोगे शुभकरणें एवंगुणविशेषणविशिष्टायां शुभपुण्यतिथौ मम आत्मन: सकलशास्त्रपुराणोक्त-फलप्राप्यर्थं श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थ मम इह जन्मनि



जन्मांतरे च अखंडित-सौभाग्य-पुत्रपौत्रादि-अभिवृद्धिधनधान्यदीर्घायुष्यादि सकल सिद्धिद्वारा श्रीमंगलागौरीव्रतांगत्वेन विहितं श्रीशिवमंगलागौरी-प्रीत्यर्थ यथाज्ञानेन यथामिलितोपचारद्रव्यै: षोडशोपचारपूजनमहे करिष्ये (उजव्या हातात पाणी घेऊन ताम्हणात सोडावे.) तत्रादौ निर्विघ्नतासिद्ध्यर्थ महागणपतिपूजनं कलशघंटापूजनं च करिष्ये।।

(नंतर तांदुळावर सुपारी ठेवून गणपतीचे ध्यान करावे.) वक्रतुंड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ निर्विघ्नं कुरू मे देव सर्वकायेषु सर्वदा (या मंत्राने गणपतीवर अक्षता वाहाव्या.) अस्मिन् पूगीफले ऋद्धिबुद्धिसहितं महागणपतिं सांगं सपरिवारं सायुधं सशक्तिकं आवाहयामि।। महागणपतिं ध्यायामि। महागणपतये नम:। आसनार्थे अक्षतान् समर्पयामि।। महागणपतये नम:। पाद्यं समर्पयामि।। (या मंत्राने पळीभर पाणी घालावे.) महागणपतये नम:। अर्घ्यं समर्पयामि।। (या मंत्राने गंधाक्षतामिश्रित पाणी घालावे.) महागणपतये नम:। आचमनीयं समर्पयामि (या मंत्राने पळीभर पाणी घालावे.) महागणपतये नम: स्नानं समर्पयामि (या मंत्राने देवाला स्नान घालावे.) महागणपतये नम:। सुप्रतिष्ठितमस्तु। महागणपतये नम:। वस्त्रोपवस्त्रार्थे कार्पासवस्त्रे समर्पयामि। (या मंत्राने

कापसाची दोन वस्त्रे वाहावी.) **महागणपतये नम:। यज्ञोपवीतं समर्पयामि।।** (या मंत्राने यज्ञोपवीत वाहावे.) **महागणपतये नम:। विलेपनार्थे चंदनं समर्पयामि** (या मंत्राने गंध लावावे.) **महागणपतये नम:। अलंकारार्थे अक्षतान् समर्पयामि।।** (या मंत्राने हळदकुंकू वाहावे.) **महागणपतये नम:। सिंदूरं नानापरिमलद्रव्याणि समर्पयामि।** (या मंत्राने शेंदूर व बुक्का अर्पण करावा.) **महागणपतये नम:। पूजार्थे ऋतुकालोद्भवपुष्पाणि दूर्वांपुराश्च समर्पयामि।** (या मंत्राने तांबडी फुले व दूर्वा वाहाव्या.) **महागणपतये नम:। धूपं समर्पयामि।** (या मंत्राने उदबत्ती ओवाळावी.) **महागणपतये नम:। दीपं समर्पयामि।** (या मंत्राने निरांजन ओवाळावे.) **महागणपतये नम:। नैवेद्यार्थे गुडखाद्यनैवेद्यं समर्पयामि।** (पाण्याने चौकोनी मंडळ काढून त्यावर गूळखोबरे ठेवून त्याचा नैवेद्य गणपतीला समर्पित करावा व पुढील मंत्र म्हणावे.) **प्राणाय नम:। अपानाय नम:। उदानाय नम:। समानाय नम:। ब्रह्मणे नम:। नैवेद्यमध्ये प्राशनार्थे पानीयं समर्पयामि** (असे म्हणून ताम्हनात पळीभर पाणी सोडावे.) **प्राणाय नम:** (हा मंत्र पुन्हा एकदा म्हणावा. नंतर) **उत्तरापाशनं समर्पयामि। हस्तप्रक्षालनं समर्पयामि। मुखप्रक्षालनं समर्पयामि।** (या मंत्राने तीन



वेळा पाणी सोडावे.) **करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि।** (या मंत्राने गणपतीला गंध लावावे.) **मुखवासार्थे पूगीफलतांबूलं सुवर्णनिष्क्रयदक्षिणां समर्पयामि।** (या मंत्राने विड्यावर दक्षिणा ठेवून त्यावर पाणी घालावे.) **महागणपतये नम:। मंत्रपुष्पं समर्पयामि।** (या मंत्राने फुले वाहावी. नंतर हात जोडून प्रार्थना करावी.) **कार्य मे सिद्धिमायातु प्रसन्ने त्वयि धातरि। विघ्नानि नाशमायांतु सर्वाणि सुरनायक। अनया विघ्नेश्वरपूजया सकलविघ्नहर्ता महागणपति: प्रीयताम्।**

## ।। कलशपूजा ।।

(नंतर तांब्याची पूजा करावी.)

**कलशस्य मुखे विष्णु: कंठे रुद्र: समाश्रित:। मूल तत्र स्थितो ब्रह्मामध्ये मातृगणा: स्मृता:। कुक्षौ तु सागरा: सर्वे सप्तद्वीपा वसुंधरा। ऋगवेदोथ यजुर्वेद: सामवेदो ह्यथवर्ण:। अंगैश्च सहिता: सर्वे कलशं तु समाश्रिता:। अत्र गायत्रिसावित्री शांति: पुष्टिकरी तथा। आयांत देवपूजार्थे दुरितक्षयकारका:। गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वती। नर्मदे सिंधु कावेरी जलेस्मिन् संनिधं कुरू। कलशाय नम:। सर्वोपचारार्थे गंधाक्षतापुष्पं समर्पयामि।** (या मंत्राने तांब्याला गंध, अक्षता व फूल लावावे.)

## ॥ घंटापूजा ॥

(नंतर घंटेची पूजा करावी.)

**आगमार्थ तु देवानां गमनार्थ तु रक्षसाम्। कुर्वे घंटारवं तत्र देवताह्वनलक्षणम्॥ घंटादेव्यै नम:। सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।** (या मंत्राने घंटेला गंध लावून अक्षता व फूल वाहावे.) **घंटानादं कुर्यात्।** (या मंत्राने घंटा वाजवावी.) **अपवित्र: पवित्रो वा सर्वावस्थां गतोपि वा। य: स्मरेत् पुंडरीकाक्षसं बाह्याभ्यंतर: शुचि:। पूजाद्रव्याणि संप्रोक्ष्य आत्मानं च प्रोक्षेत्।** (या मंत्राने फुलाने पूजेच्या साहित्यावर पाणी शिंपडून नंतर ते आपल्या अंगावर शिंपडावे.)

**अथ ध्यानम्। कुंकुमापरिलिप्तांगां सर्वाभरणभूषितां। नीलकंठप्रियां गौरीं वंदेहं मंगलाह्वयाम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। ध्यायामि॥** (या मंत्राने मंगलागौरीवर अक्षता वाहून नमस्कार करावा.)

**अत्रागच्छ महादेवि सर्वलोकसुखप्रदे। यावद्व्रतमहं कुर्वे पुत्रपौत्राभिवृद्धये। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। अवाहनार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने अक्षता वाहाव्या.) **रौप्येण चासनं दिव्यं रत्नमणिक्यशोभितम्। मयानीतं गृहाण त्वं गौरी कामारिवल्लभे। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। आसनार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने अक्षता वाहाव्या.) **गंगादिसर्वतीर्थेभ्यो मया प्रार्थनयाहृतम्। तोयमेतत्सुखस्पर्श पाद्यार्थ प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। पाद्यं समर्पयामि।** (या मंत्राने पळीभर पाणी घालावे.) **गंधपुष्पाक्षतैर्युक्तमर्घ्यं संपादितं मया। गृहाण मंगलेगौरी प्रसन्न भव सर्वदा। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। अर्घ्यं समर्पयामि।** (या मंत्राने गंध, अक्षता व फूलमिश्रित पाणी घालावे.) **कामारिवल्लभे देवि कुर्वाचमनमंबिके। निरंतरमहं वंदे चरणौ तव पार्वति॥ श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। आचमनीयं समर्पयामि।** (या मंत्राने पळीभर पाणी घालावे.) **जाह्नवी तोयमानीतं जलं कर्पूरसंयुतम्। स्नापयामि सुरश्रेष्ठे त्वां पुत्रादिफलप्रदाम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: स्नानं समर्पयामि।** (या मंत्राने पळीभर पाणी घालावे.) **पंचामृतै: स्नपयिष्ये** (या मंत्राने पळीभर पाणी घेऊन ताम्हनात उदक सोडावे.) **सौरभेय्या महदिव्यं पवित्र पुष्टिवर्धनम्। स्नानार्थं ते मया दत्तं गृहाणेदं नमोस्तु ते॥ श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। पय:स्नानं समर्पयामि। पय:स्नानांते शुद्धोदकस्नानं समर्पयामि** (या मंत्राने दूध घालावे. नंतर दोन पळ्या पाणी घालावे.) **सर्वोपचारार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने

अक्षता वाहाव्या.) **चंद्रमंडलसंकाशं सर्वदेवप्रियं दधि। स्नानार्थे ते प्रयच्छामि प्रीता भव सुरेश्वरी।। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। दधिस्नानं समर्पयामि। दधिस्नानांते शुद्धोदकस्नानं समर्पयामि। सर्वोपचारार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने दही घालावे, नंतर दोन पळ्या पाणी घालावे व अक्षता वाहाव्या.) **घृतकुंभसमायुक्ते घृतयोने घृतप्रिये। घृतभुग्घृतधामासि घृतं स्नानाय गृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: घृतस्नानं समर्पयामि। घृतस्नानांते शुद्धोदकस्नानं समर्पयामि। सर्वोपचारार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने तूप घालावे, नंतर दोन पळ्या पाणी घालावे व अक्षता वाहाव्या.) **सर्वोषधिसमुत्पन्नं पीयुषसदृशं मधु। स्नानार्थं ते मया दत्तं गृहाण परमेश्वरी। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: मधुस्नानं समर्पयामि। मधुस्नानांते शुद्धोदकस्नानं समर्पयामि। सर्वोपचारार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने मध घालून नंतर दोन पळ्या पाणी घालावे व अक्षता वाहाव्या.) **इक्षुदंडसमुत्पन्ना रस्या स्निग्धतरा शुभा। शर्करेयं मया दत्ता स्नानार्थ प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। शर्करास्नानं समर्पयामि। शर्करास्नानांते शुद्धोदकस्नानं समर्पयामि। सर्वोपचारार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने साखर घालून नंतर दोन



पळ्या पाणी घालावे व अक्षता वाहाव्या.) **मलयाचलसंभूतं चंदनागरुवासितं। तोयमेतत्सुखस्पर्शं स्नानार्थं प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। गंधोदकस्नानं समर्पयामि। गंधोदकस्नानांते शुद्धोदकस्नानं समर्पयामि।।** (या मंत्राने पळीभर पाणी घेऊन त्यात गंध घालावे व ते पाणी देवाला वाहावे. नंतर दोन पळ्या पाणी घालावे. नंतर गंधापासून पंचोपचार पूजा करावी.) **श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: विलेपनार्थे चंदनं समर्पयामि।** (या मंत्राने गंध लावावे.) **अलंकारार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने अक्षता वाहाव्या.) **श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: पूजार्थे पुष्पं समर्पयामि।** (या मंत्राने फुले वाहावी.) **श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: धूपं समर्पयामि। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: दीपं समर्पयामि। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। नैवेद्यार्थ पयोनैवेद्यं समर्पयामि। प्राणाय नम:। अपानाय नम:। व्यानाय नम:। उदानाय नम:। समानाय नम:। ब्रह्मणे नम:। नैवेद्यमध्ये प्राशनार्थे पानीयं समर्पयामि।** (या मंत्राने पळीभर पाणी घेऊन उदक सोडावे. नंतर वरील मंत्राने पुन्हा नैवेद्य दाखवावा.) नंतर **उत्तरापोशनं समर्पयामि। हस्तप्रक्षालनं समर्पयामि। मुखप्राक्षलनं समर्पयामि।** (या मंत्राने तीन वेळा पळीने पाणी घेऊन उदक सोडावे.)

करोद्धनार्थे चंदनं समर्पयामि। (या मंत्राने गंध लावावे.) मुखवासार्थे पूगीफलतांबूलं समर्पयामि। सुवर्णपुष्पदक्षिणां समर्पयामि। (या मंत्राने विडा, दक्षिणा, खारीक, बदाम, केळे वगैरे देवापुढे ठेवून त्यांवर पळीभर पाणी घालावे.) श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः। मंत्रपुष्पं समर्पयामि। (या मंत्राने फूल वाहावे व नमस्कार करावा.) अनेन कृतपूर्वाराधनेन तेन श्रीशिवमंगलागौर्या प्रीयेताम्। (या मंत्राने पळीभर पाणी घेऊन उदक सोडावे.) उत्तते निर्माल्यं विसृजेत्। (या मंत्राने देवावरचे फूल घेऊन त्याचा वास घ्यावा व ते आपल्या डाव्या बाजूस ताम्हणांत टाकावे व नंतर खालील मंत्राने देवीवर पाण्याचा अभिषेक करावा.) महिम्नः पारं ते परमविदषो यद्यसदृशी स्तुतिर्ब्रह्मादीनामपि तदवसन्नास्त्वयि गिरः।। अथावाच्यः सर्वः स्वमतिपरिणामावधि गृणन् ममाप्येष् स्तोत्रे हर निरपवादः परिकरः।।१।। अतीतः पंथानं तव च महिमा वाङ्मनसयोरद्व्यावृत्त्यायं चकितमभिधत्ते श्रुतिरपि।। स कम्य स्तोतव्यः कतिविधगुणाः कस्य विषयः पदे त्वर्वाचीने पतति न मनः कस्य न वचः।।२।। मधुस्फीता वाचः परमममृतं निर्मितवतस्तव ब्रह्मान्किं वागपि सुरगुरार्विस्मयपदम्।। मम त्वेतां वाणीं गुणकथनपुण्येन भवतः पुनामीत्यर्थेऽस्मिन् पुरमथन



बुद्धिर्व्यवसिता।।३।। तवैश्वर्य यत्तज्जगदुदयरक्षा-प्रलयकृत्त्रयीवस्तु व्यस्तं तिसृषु गुणभिन्नासु तनुषु। अभव्यानाममिन्वरद रमणीयामरमणीं विहंतुं व्याक्रोशीं विदधत इहैके जडाधियः।।४।। किमीहः किंकायः स खलु किमुपयास्त्रिभुवनं किमधारो धाता सृजति किमुपादान इति च।। अतक्यैश्वर्ये त्वय्यनवसरदुःस्थो हतधियः कुतर्कोऽयं कांश्चिन्मुखरयति मोहार जगतः।।५।। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः।। महाभिषेकस्नानं समर्पयामि। काश्मीरागरुकस्तूरी कर्पूरमलयान्वितम्। उद्वर्तनं मया दत्तं गृह्यतां परमेश्वरी।। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः मांगलिकस्नानं समर्पयामि। (या मंत्राने सुवासिक तेल लावून गरम पाणी देवीला घालावे.) वस्त्रं च सोमदैवत्यं लज्जायास्तु निवारणम्। मया निवेदितं भक्त्या गृहाण परमेश्वरी। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः। वस्त्रोपवस्त्रे कार्पावस्त्रं समर्पयामि। (या मंत्राने कापसाची वस्त्रे वाहावी.) नवरत्नादिभिर्बद्धां सौवर्णेन च तंतुभिः। निर्मितां कंचुकीं भक्त्या गृहाण परमेश्वरी। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः। कंचुकीं समर्पयामि। (या मंत्राने चोळीबद्दल अक्षता वाहाव्या.) कुंकूमागरूकर्पूरं कस्तूरीचंदनं तथा। विलेपनं महादेवि गंधं दास्यामि भक्तितः। श्रीशिवमंगलागौरीभ्यां

**नम:। विलेपनार्थे चंदनं समर्पयामि।** (या मंत्राने गंध लावावे.) **अक्षताश्च सुरश्रेष्ठा: कुंकुमेन विराजिता: मया निवेदिता भक्त्या गृहाण परमेश्वरी। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: अलंकारार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने अक्षता वाहाव्या.) **हरिद्रास्वर्णवर्णाभा सर्वसौभाग्यदायिनी। सर्वालंकारमुख्या हि देवि त्वं प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। हरिद्रां समर्पयामि।** (या मंत्राने हळद वाहावी.) **हरिद्राचूर्णसंयुक्तं कुंकुमं कामदायकम्। वस्त्रलंकरणं सर्वं देवि त्वं प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। कुंकुमं समर्पयामि।** (या मंत्राने कुंकू वाहावे.) **कज्जलं दीपसंभूतं स्त्रीणां लोचनभूषणम्। नेत्रयो: सुखदं चैव मया दत्तं प्रगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम:। कज्जलं कुमुकसन्निभम्। सीमंतभूषणार्थाय सिंदूरं प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: सिंदूर समर्पयामि।** (या मंत्राने शेंदूर वाहावा.) **नानासुगंधिकं द्रव्यं चूर्णीकृत्य प्रयत्नत:। ददामि ते नमस्तुभ्यं प्रीत्यर्थ प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: नानापरिमलद्रव्यं समर्पयामि।** (या मंत्राने बुक्का, अष्टगंध, अर्गजा वगैरे द्रव्ये वाहावी.) **वज्रमाणिक्यवैडूर्यमुक्ताविद्रुममंडितम्। पुष्परागसमायुक्तं भूषणं प्रतिगृह्यताम्।**



**श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: भूषणादि समर्पयामि।** (या मंत्राने भूषणादि सर्व अलंकाराप्रीत्यार्थ अक्षता वाहाव्या.) **माल्यादीनि सुगंधीनि मालत्यादिनि वै प्रभो। मरा हृतानि पूजार्थं पुष्पाणि प्रतिगृह्यताम्। करवीरैर्जाति-कुसुमैश्चंपकैर्बकुलै: शुभै: शतपत्रैश्च कल्हारैरर्चये परमेश्वरि। सेवंतिका-बकुल-चंपकपाटलाब्जै: पुन्नागजाति-करवीर-रसालपुष्पै:। बिल्वप्रवाल-तुलसीदलमालतीभिस्त्वां पूजयामि जगदीश्वरि मे प्रसीद। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: पूजार्थं नानाविधपुष्पाणि समर्पयामि।** (या मंत्राने बेल व विविध प्रकारची फुले वाहावी.)

## ॥ अथांगपूजा ॥

(खालील नावांनी देवीच्या पायापासून मस्तकापर्यंत अक्षता अगर फुले वाहून पूजा करावी.) **उमायै नम: पादौ पूजयामि** (या मंत्राने पायांवर अक्षता वाहाव्या.) **गौर्ये नम: जंघे पूजयामि** (या मंत्राने जंघांवर), **पार्वत्यै नम: जानुनी पूजयामि** (या मंत्राने गुडघ्यावर), **जगद्धात्र्यै नम: ऊरू पूजयामि।** (या मंत्राने मांडीवर), **जगत्प्रतिष्ठायै नम: कटिं पूजयामि।** (या मंत्राने कंबरेवर), **शांतिरूपिण्यै नम: ललाटं पूजयामि।** (या मंत्राने कपाळावरती), **मंगलदात्र्यै नम: शिर: पूजयामि** (या मंत्राने मस्तकावर), **पुत्रदायिन्यै**

**नमः सर्वांग पूजयामि।** (या मंत्राने सर्व शरीराच्या अंगांवर अक्षता वाहाव्या.)

## ॥ अथ पत्रपूजा ॥

**अपामार्गस्य पत्रैश्च दूर्वाधत्तुरसंज्ञकैः दूर्वाषोडसंख्या-कैर्बिल्वपत्राणि पंच च।** (खालील नावांनी देवीला पत्री वाहावी.) **गौर्यै नमः मालतीपत्रं समर्पयामि।** (मोगरीचे पान), **पार्वत्यै नमः भृगराजपत्रं समर्पयामि।** (माक्याचे पान), **जगद्धात्र्यै नमः बिल्वपत्रं समर्पयामि** (बेलाचे पान), **जगत्प्रभायै नमः बदरीपत्रं समर्पयामि।** (बोरीचे पान), **शांतिरूपिण्यै नमः धत्तूरपत्रं समर्पयामि।** (धोत्र्याचे पान), **देव्यै नमः तुलसीपत्रं समर्पयामि।** (तुळशीचे पान), **लोकवंद्यायै नमः शमीपत्रं समर्पयामि।** (शमीचे पान), **काल्यै नमः अपामार्गपत्रं समर्पयामि।** (आघाड्याचे पान), **शिवायै नमः बृहतीपत्रं समर्पयामि।** (डोरलीचे पान), **भवान्यै नमः करवीरपत्रं समर्पयामि।** (कण्हेरीचे पान), **रुद्राण्यै नमः अर्कपत्रं समर्पयामि।** (रुईचे पान), **शर्वाण्यै नमः अर्जुनपत्रं समर्पयाम।** (अर्जुनसादड्याचे पान), **मंगलगौर्यै नमः विष्णुक्रांतपत्रं समर्पयामि।** (विष्णुक्रांताचे पान), **मंगलदात्र्यै नमः नानाविधपत्राणि समर्पयामि** (नाना प्रकारची पत्रे), **नमः**



**शिवाय नमः** (या मंत्राने तीळ, तांदूळ, जीरकादि नानाविध धान्ये मुठीने वाहावीत. नंतर बेल वाहावे.)

**देवद्रुमदसोद्भूतः कृष्णागरुसमन्वितः। आघ्रेय सर्वदेवानां धूपोऽयं प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः धूपं समर्पयामि।** (या मंत्राने धूप दाखवावा.) **त्वं ज्योतिः सर्वदेवानां तेजसां तेज उत्तमम्। आत्मज्योतिः परं धाम दीपोऽयं प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः दीपं समर्पयामि।** (या मंत्राने दिवा ओवाळावा.) **अन्नं चतुर्विधं स्वादुरसैः षड्भिः समन्वितम्। भक्ष्यं भोज्यसमायुक्तं नैवेद्यं प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः नैवेद्यार्थे पयोनैवेद्यं समर्पयामि।** (नंतर पाण्याने चौकोनी मंडल करून त्यावर दुधाची वाटी ठेवून त्याचा नैवेद्य खालील मंत्राने दाखवावा.) **प्राणाय नमः अपानाय नमः व्यानाय नमः उदानाय नमः समानाय नमः ब्रह्मणे नमः** (या मंत्रांनी नैवेद्य दाखवून नंतर) **नैवेद्यमध्ये प्रशानार्थे पानीयं समर्पयामि।** (या मंत्राने पळीभर पाणी घेऊन उदक सोडावे.) नंतर **पुनः प्राणाय नमः** (इत्यादि मंत्र म्हणून नैवेद्य दाखवावा. व नंतर) **उत्तरापोशनं समर्पयामि। हस्तप्रक्षालनं समर्पयामि। मुखप्रक्षालनं समर्पयामि। कराद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि।** (या मंत्रांनी तीन वेळा उदक सोडून

नंतर देवीला गंध लावावे.) **पूगीफलं महद्दिव्यं नागवल्या दलैर्युतम्। कर्पूरैलासमायुक्तं तांबूलं प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: मुखवासार्थे पूगीफलतांबूलं समर्पयामि। इदं फलं मया देव स्थापित पुरतस्तव। तेन मे सुफलावाप्तिर्भवेज्जन्मनि जन्मनि। हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसो:। अनंतपुण्यफलदमत: शान्ति प्रयच्छ मे। श्रीशिवमंगलागौरीभ्या नम: सुवर्णपुष्पदक्षिणां समर्पयामि।** (या तीन मंत्रांनी देवीला विडा, केळे, पेरू वगैरे फळे व महादक्षिणा ठेवून त्यावर उदक सोडावे.) **चंद्रादित्यौ च धरणिर्विद्युदग्निस्तथैव च। त्वमेव सर्वज्योतिषि आर्तिक्यं प्रतिगृह्यताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: महानीरंजनदीपं कर्पूरार्तिक्यं समर्पयामि।** (या मंत्राने कापूर, काडवाती वगैरे लावून देवाला ओवाळावे.) **नमो देव्यै महोदेव्यै शिवायै सततं नम:। नम: प्रकृत्यै भद्रायै नियता: प्रणता: स्म ताम्। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: मंत्रपुष्पं समर्पयामि।** (या मंत्राने फुल वाहावे.) **प्रदक्षिणात्रयं चैव करिष्यामि पदे पदे। पापघ्नं दव देवेशि दु:खं मे हर सुव्रते। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: प्रदक्षिणां समर्पयामि।** (या मंत्राने प्रदक्षिणा घालावी.) **साष्टांगोऽय प्रणामस्ते नमस्कृत्य यथाविधि। त्वद्दास इति मे भक्त्या प्रसीद**



**परमेश्वरी। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: नमस्कारं समर्पयामि।** (या मंत्राने नमस्कार करावा.) **श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: गीतं नृत्यं वाद्यं छत्रं चामरं व्यजनं सर्वराजोपचारार्थे अक्षतान् समर्पयामि।** (या मंत्राने अक्षता वाहाव्या. नंतर हातामध्ये फुले घेऊन हात जोडून देवीची प्रार्थना खालील मंत्रानी करून ती फुले अंजलीने देवीला वाहावी.) **आवाहनं न जानामि न जानामि विसर्जनम्। पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वरी। अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम। तस्मात्कारुण्यभावेन रक्षस्व परमेश्वरी। गतं पापं गतं दु:खं गतं दारिद्यमेव च। आगता सुखसंपत्ति: पुण्याच्च तव दर्शनात्। मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वरि। यत्पूजितं मया देवि परिपूर्ण तदस्तु मे। पुत्रान्देहि धनं देहि सौभाग्यं देहि मंगले। अन्यांश्च सर्वकामांश्च देहि देवि नमोस्तु ते। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नम: प्रार्थना समर्पयामि।** (या मंत्राने फुले वाहून नमस्कार करावा.) **अद्येत्यादिपूर्वोच्चरितवतेमानएवंगुणविशेषविशिष्टायां शुभपुण्यतिथौ मम आत्मन: पुराणोक्त फलप्राप्त्यर्थ पूजासांगतासिद्ध्यर्थं अर्घ्यप्रदानं करिष्ये।** (नंतर पळीमध्ये पाणी घेऊन त्यात गंध, अक्षता, फूल, पैसा, सुपारी, घालून खालील मंत्रानी तनी अर्घ्ये सोडावी.) मंत्र.


सर्वसंपत्प्रदे देवि सर्वकामप्रदायिनि। मंगलागौरी मां पाहि गृहाणार्घ्यं नमोस्तु ते। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः इदमर्घ्यं समर्पयामि। (या मंत्राने एक अर्घ्य सोडावे.) कस्तूरीकुंकुमोपेतं सकर्पूरं सचंदनम्। गंधपुष्पाक्षतैर्युक्तं गृहाणार्घ्यं नमोऽस्तुत ते। श्रीशिवमंगलागौरीभ्यां नमः इदमर्घ्यं समर्पयामि। (या मंत्राने दुसरे अर्घ्य सोडावे.) अवैधव्यं च सौभाग्यं देहि त्वं मम सुव्रते। पुत्रान्पौत्रांश्च सौख्यं च गृहाणार्घ्यं नमोऽस्तु ते। श्रीमंगलागौरीभ्यां नमः इदमर्घ्यं समर्पयामि। (या मंत्राने तिसरे अर्घ्यदान सोडावे.) यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपःपूजाक्रियादिषु। न्यूनं संपूर्णतां याति सद्यो वंदे तमच्युतम्। अनेन यथाज्ञनेत कृतपूजनेन तेन श्रीशिवमंगलागौर्यौ प्रीयेताम्। अद्येत्यादिपूर्वोच्चरितवर्तमानएवंगुणाविशेषण-विशिष्टायां शुभपुण्यातिथौ मम आत्मनः पुराणोक्तफलप्राप्त्यर्थं श्रीपरमेश्वरप्रीत्यार्थं पूजासांगता-सिद्ध्यर्थं ब्राह्मणपूजनं करिष्ये। (या मंत्राने पळीभर पाणी घेऊन उदक सोडावे. नंतर खालील मंत्राने आसनापासून ब्राह्मणाची पूजा करावी.) महाविष्णुस्वरूपिणे ब्राह्मणाय इदमासनं। स्वासनम्। इदं पाद्यम्। सुपाद्यम्। इदमर्घ्यम् अस्त्वर्घ्यम्। इदमाजमनीयम्। अस्त्वाचमनीयम्। गंधाः पांतु। सौमंगल्यं चास्तु। अक्षताः पांतु। आयुष्यमस्तु।



पुष्पं पांतु। सौश्रेयमस्तु। तांबुलं पांतु। ऐश्वर्यमस्तु। दक्षिणाः पातुं। बहुदेयं चास्तु। दीर्घमायुः श्रेय शांतिः पुष्टिस्तुष्टिश्चास्तु। नमोस्त्वनंताय सहस्रमूर्तये सहस्रपादक्षिशिरारूबाहवे सहस्रनाम्ने पुरूषाय शाश्वते सहस्रकोटीयुगधारिणे नमः। सकलाराधनैः स्वर्चितम्। (या मंत्रांनी ब्राह्मणाच्या हातावर गंध, अक्षता, फूल, विडा व दक्षिणा देऊन त्यावर पाणी घालावे व मस्तकावर अक्षता वाहून नमस्कार करावा.) अनेन कर्मणा भगवान् परमेश्वरः प्रीयताम्। ॐ तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु।

॥ इति श्रीमंगलागौरीपूजा समाप्त ॥

॥ शुभं भवतु ॥



# मंगळागौरीची कहाणी

आटपाट नगर होतं. तिथं एक वाणी होता. त्याला एकही अपत्य नव्हतं. त्याच्या घरी एक गोसावी येई. 'अलख' म्हणून पुकार करी. वाण्याची बायको भिक्षा आणी. "निपुत्रिकाच्या हातची भिक्षा घेत नाही," असं म्हणून तो चालता होई. ही गोष्ट तिनं नवऱ्याला सांगितली. त्यानं तिला एक युक्ती सांगितली. "दाराच्या आड लपून बस, अलख म्हणताच भिक्षा घाल." अशी भिक्षा झोळीत घातली. बुवाचा नेम मोडला. तो बाईवर फार रागवला. मूलबाळ होणार नाही असा शाप दिला. तिनं त्याचे पाय धरले. बुवांनी उःशाप दिला. बुवा म्हणाले, "आपल्या नवऱ्याला सांग. निळ्या घोड्यावर बस. निळी वस्त्रं परिधान कर. रानांत जा. जिथं घोडा अडेल तिथं खण. देवीचं देऊळ लागेल, तिची प्रार्थना कर. ती तुला पुत्र देईल" असं बोलून बुवा चालता झाला. तिनं आपल्या पतीला ही गोष्ट सांगितली. वाणी रानात गेला. घोडा अडला. तिथं खणलं. देवीचं देऊळ लागलं. सुवर्णाचं देऊळ आहे. हिरेजडिताचे खांब आहेत. माणकांचे कळस आहेत. आत देवीची मूर्ती आहे. त्यानं मनोभावे देवीची पूजा केली. त्याला देवी प्रसन्न झाली. "वर माग" म्हणाली. तो म्हणाला, "घरदार आहे, गुरंढोरं आहेत, धनद्रव्य आहे; पोटी पुत्र नाही, म्हणून दुःखी आहे." देवी म्हणाली, "तुला संततीचं सुख नाही, मी प्रसन्न झाले आहे तर तुला वर देते. अल्पायुषी पुत्र घेतल्यास गुणी मिळेल, दीर्घायुषी घेतलास तर जन्मांध होईल, कन्या घेतलीस तर बालविधवा होईल., इच्छा असेल ते मागून घे." त्यानं अल्पायुषी पुत्र मागितला. "माझ्या मागच्या बाजूस जा. तिथं एक गणपती आहे. त्याच्यामागं आंब्याचं झाड आहे. गणपतीच्या दोंदावर पाय दे, एक फळ घे. घरी



जाऊन बायकोला खाऊ घाल, म्हणजे तुझा कार्यभाग होईल," असं देवीनं सांगितलं. नंतर देवी अदृश्य झाली.

वाणी देवळामागे गेला. गणपतीच्या दोंदावर पाय दिला, झाडावर चढला. पोटभर आंबे खाल्ले. मोटभर घरी नेण्याकरता घेतले. खाली उतरून पाहू लागला, तो आपल्या मोटेत एकच आंबा आहे. असं चारपाच वेळा झालं. गणपतीला त्रास झाला. त्यानं सांगितलं, "तुझ्या नशिबी एकच फळ आहे." फळ घेऊन घरी आला. बायकोला खाऊ घातलं, ती गरोदर राहिली, दिवसामासांनी गर्भ वाढू लागला. नवमास पूर्ण झाले. वाण्याची बायको बाळंतीण झाली. मुलगा झाला. उभयतांना मोठा आनंद झाला. मुलगा दिवसामासांनी वाढू लागला. आठव्या वर्षी त्याची मुंज केली. 'दहाव्या वर्षी लग्न करा' असं वाण्याची बायको म्हणाली. काशीयात्रेशिवाय लग्न करणं नाही असा माझा नवस आहे, असा मुलानं जबाब दिला. काही दिवसांनी त्यास मामाबरोबर यात्रेस पाठविलं. मामाभाचे काशीला जाऊ लागले. जाताजाता काय झालं? वाटेत एक नगर लागलं. तिथं काही मुली खेळत होत्या. त्यांत एकमेकींचं भांडण लागलं होतं. एक गोरी भुरकी मुलगी होती, तिला दुसरी मुलगी म्हणू लागली, "काय रांड द्वाड आहे! काय रांड द्वाड आहे!" तेव्हा ती मुलगी म्हणाली, "माझी आई मंगळागौरीचं व्रत करते, आमच्या कुळवंशामध्ये कोणी रांड होणार नाही. मग मी तर तिची मुलगी आहे." हे भाषण मामानं ऐकलं. त्याच्या मनात आलं, हिच्याशी भाच्याचं लगीन करावं, म्हणजे हा दीर्घायुषी होईल. परंतु हे घडेल कसं? त्याच दिवशी दोघांनी तिथं मुक्काम केला.

इकडे काय झालं? त्याच दिवशी त्या मुलीचं लग्न होतं. लग्नाच्या वेळेस नवरा मुलगा आजारी झाला. मुलाच्या आईबापांना पंचाईत पडली. पुढे कोणीतरी प्रवासी मिळेल तर बरं होईल. त्याला पुढे करून वेळ साजरी करू. म्हणून ते धर्मशाळा पाहू लागले. तेव्हा हे मामाभाचे त्यांच्या दृष्टीस पडले. मामापासून भाच्याला नेलं. गोरज लग्न लावलं. उभयतांना गौरीहारापाशी निजवलं. दोघं झोपी गेली. मुलीला देवानं स्वप्नात दृष्टांत दिला, "अगं अगं मुली, तुझ्या नवऱ्याला दंश करायला सर्प येईल, त्याला पिण्याकरता दूध ठेव. एक कोरा करा जवळ ठेव. दूध पिऊन सर्प कऱ्यात शिरेल. आंगच्या चोळीनं कऱ्याचे तोंड बांधून टाक. सकाळी उठून आईला ते वाण दे." तिनं सर्व तयारी केली. दृष्टान्ताप्रमाणे घडून आलं. काही वेळानं तिचा नवरा उठला. भूक लागली म्हणू लागला. तिनं त्याला लाडू खायला दिले. फराळ झाल्यावर त्यानं तिला आपली अंगठी दिली. पहाटेस उठून ताट घेऊन बिऱ्हाडी गेला. मामाभाचे मार्गस्थ झाले.

दुसरे दिवशी काय झालं? हिनं सकाळी उठून स्नान केलं, आपल्या आईला वाण दिलं. आई उघडून पाहू लागली, तो आत हार निघाला. आईनं कन्येच्या गळ्यात हार घातला. पुढे पहिला वर मंडपात आला. मुलीला खेळायला आणलं. ती म्हणाली, "हा माझा नवरा नाही. मी त्याच्याबरोबर खेळत नाही." रात्रीची लाडवांची व अंगठीची खूण काही पटेना. आईबापांना पंचाईत पडली. हिचा नवरा कसा सापडतो? नंतर त्यांनी अन्नछत्र चालू केलं. जो ब्राह्मण येईल त्याचे पाय अंगठी घालून मुलीनं धुवावे, आईनं पाणी घालावं. भावानं गंध लावावं आणि बापानं विडा द्यावा, असा क्रम चालू केला. शेकडो लोक येऊन जेवू लागले.



इकडे मामाभाचे काशीस गेले. पुष्कळ दानधर्म केला. तीर्थयात्रा केल्या. ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले. एके दिवशी भाच्याला मूर्च्छा आली. यमदूत प्राण न्यायला आले. मंगळागौर आडवी आली. त्या दोघांचं युद्ध झालं. यमदूत पळून गेले आणि गौर तिथं अदृश्य झाली. भाचा जागा झाला, तसा आपल्या मामाला सांगू लागला, "मला असं असं स्वप्न पडलं." मामा म्हणाला, "ठीक झालं, तुझ्यावरचं विघ्न टळलं. उद्या आपण घरी जाऊ." दोघं परत येऊ लागले. लग्नाच्या गावी आले. तळ्यावर स्वयंपाक करू लागले. दासींनी येऊन सांगितलं, "इथं अन्नछत्र आहे. तिथं जेवायला जा." ते म्हणाले, "आम्ही परान्न घेत नाही." दासींनी यजमानणीस ही गोष्ट सांगितली. त्यांनी पालखी पाठवली. आदरतिथ्यानं घरी नेलं. पाय धुतांना मुलीनं नवऱ्याला ओळखलं. नवऱ्यानं अंगठी ओळखली. आईबापांनी विचारलं, "तुझ्याजवळ खूण काय आहे?" त्यानं लाडवांचं ताट दाखवलं. सर्वांना आनंद झाला. भोजनसमारंभ झाला. मामाभाचे सून घेऊन घरी आले. सासूनं सुनेचे पाय धरले. "तुझ्यामुळं माझा मुलगा वाचला," असं म्हणाली. तिनं सांगितलं, "माझं मंगळागौरीचं व्रत असतं. ही सगळी तिचीच कृपा." सासरमाहेरची, घरचीदारची सर्व माणसं एकत्र झाली, आणि या व्रताचं उद्यापन केलं.

**तिला जशी मंगळागौरी प्रसन्न झाली, तशी तुम्हां आम्हांलाही होवो, आणि आपलं सौभाग्य अखंड राहो, इतकीच देवाची प्रार्थना करा. ही धर्मराजाला कृष्णानं सांगितलेली साठा उत्तरांची कहाणी, पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.**

* * *

# आरत्या

## गणपतीची आरती

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।। सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची ।। कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ।।१ ।। जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।। दर्शनमात्रें मनकामना पुरती ।।धृ०।। रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा। चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।। हिरेजडित मुगुट शोभतो बरा ।। रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ।। जय० ।।२ ।। लंबोदर पितांबर फणिवरबंधना ।। सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।। दास रामाचा वाट पाहे सदना ।। संकटी पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ।। जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।। दर्शन० ।।३ ।।

## श्रीमंगळागौरीची आरती

## जयदेवी मंगळागौरी (१)

जयदेवी मंगळागौरी ।। ओंवाळीन सोनिया ताटीं ।। रत्नांचे दिवे ।। माणिकांच्या वाती ।। हिरेया मोती ज्योती ।।धृ० ।। मंगळमूर्ती उपजली कार्या ।। प्रसन्न झाली अल्पायुषी राया ।। तिष्ठली राज्यबाळी ।। आयोपण द्यावया ।।जय० ।।१ ।। पूजेला ग आणिती जाई जुईच्या कळ्या ।। सोळा तिकटीं सोळा दूर्वा ।। सोळा परींची पत्री ।। जाई जुई आबुल्या ।। शेवंती नागचांपे ।। पारिजातकें मनोहरें ।। गोकर्ण महाफुलें ।। नंदेटें तगरें ।। पूजेला ग आणिलीं ।।जय० ।।२ ।। साळीचे तांदूळ मुगाची डाळ ।। आळणी खिचडी रांधिती नारी ।। आपुल्या पतिलागीं ।। सेवा करिती फार ।।जय० ।।३ ।। डुम डुम डुम डुम वाजंत्री वाजती ।। कळावी कांकणें गौरीला शोभती ।। शोभती बाजुबंद ।। कानीं कापांचे गबे ।। ल्यायिली अंबा शोभे ।।जय० ।।४ ।। न्हाऊनी माखुनी मौनी बैसली ।। पाटावाची चोळी क्षीरोदक नेसली ।। स्वच्छ बहुत होउनी ।। अंबा पूजूं बैसली ।।जय० ।।५ ।। सोनियाच्या ताटीं घातिल्या पंचारती ।। मध्यें उजळती कापुराच्या वाती ।। करा धूप दीप ।। आतां नैवेद्य षड्रस पक्वानें ।। ताटीं भरा बोनें ।।जय० ।।६ ।। लवलाह तिघें काशीसी निघालीं ।। माउली मंगळागौर भिजवूं विसरली ।। मागुती परतुनियां आली ।। अंबा स्वयंभू देखिली ।। देऊळ सोनियाचें ।। खांब हिरेयांचे ।। कळस मोतियांचा ।।जय० ।।७ ।।

## ओवाळू आरती मंगळागौरी तुजला (२)

ओवाळू आरती मंगळगौरी तुजला। सौभाग्या देई आम्हा हीच विनंती तुजला ।।धृ०।। श्रावण मंगळवारी जमु सगळ्या आम्ही नारी।। अर्पू वसन जरतारी बहुत प्रकारी। माला या सुमनांच्या अर्पूनी पूजनाला ।।१।। षोडस परीची पत्री ठेवूनी यास सत्पात्री। आनंदे आम्ही युवती वाहू तुज अति प्रिती। स्वीकारी पूजेला वंदीत तव चरणा।।२।। वंदन करितो तुजला भक्तीने आम्ही बाला। दावीन सन्मार्गाला यास्तव नमू चरणाला। अज्ञानी आम्ही बाला तारि या सकला ।।३।। प्रार्थी सुशी तभया ही चीर सौभाग्या देई। मागत नच तव काही ह्यावीण अंबाबाई प्रेमाने परिसावे हिच विनंती तुला ।।४।।

## आरती मंगळागौरी (३)

जय देवी जय देवी जय मंगळागौरी। आरती ओवाळीते सेवा स्वीकारी ।।ध्रु०।। आदिअनादी अगोचर तू तेजोराशी। सत्यसनातन सुंदर अविचल अविनाशी।। तव मंदिर भूगर्भी दिसले विप्रासी। लेवुनि रत्नाभरणे तू तेथे राहसी ।।१।। सोळाविध फुलपात्री अमृताची वाटी। खण श्रीफळ मोत्यांनी भरलेली ओटी। निरांजन रत्नांचे सोन्याचे ताटी। माणीकांच्या ज्योती तेवती तुजसाठी ।।२।।

## आरती मंगळागौरी (४)

जयदेवी मंगळागौरी। सुवासिन मी तुला पुजिते ।।ध्रु०।। कुंकुमतिलक माझ्या ललाटी। मंगलमणी दे शोभत कंठी। रत्नपाचुचा चुडा मनगटी। स्त्रीजन्माचे अहेव लेणे। तुझ्या कृपेने मला लाभले ।।१।। शिवशंकराहुनी प्रेमळ भोळा। दिधलासी पती तू भाग्यवतीला। देहाच्या देवारी पुजीन त्याला। हृदयाची आरती प्राणांच्या ज्योती। अमृत तेजाळ प्रित जळते ।।२।।

## आरती

मागू शाश्वत सौभाग्याप्रति गौरीला। उजळू पंचारती तुजला ।।ध्रु०।। जमू सगळ्या जणी एक स्थळी। सात्त्विक वृत्ती आणुनी चित्ती। आसन करू स्थिर मागू ।।१।। श्रावण मंगळवारी हिला। घालू स्नाने भरजरी वस्त्रे। कंचुक मौतिक मागू ।।२।। नेत्री अंजन घालू आधी। कंठी भूषण हाती कंकण। नासी नथ मग मागू ।।३।। पंचामृती ते पूजन करू। कुंकुम



अबीर शेंदूर बुक्का। वाहू अक्षता मागू ।।४।। षोडस परीची पत्री आणू। खाज्या करंज्या जिलब्या ताज्या। नैवेद्याप्रती मागू ।।५।। जन्मांतरीचे दुःख हरी। जाऊ शरणा दृढ धरी चरणा। कृष्णे समवेत मागू ।।६।।

## श्रीदेवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं।। अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं।। वारीं वारीं जन्ममरणातें वारीं।। हारीं पडलों आतां संकट नीवारीं ।।१।। जय देवी जय देवी महिषासुरमथिनी।। सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ।।जय० ।।धृ०।। त्रिभुवनभुवनीं पहातां तुजऐसी नाहीं। चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं।। साही विवाद करितां पडले प्रवाहीं।। ते तूं भक्तांलागीं पावसि लवलाही ।।जय० ।।२।। प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा।। क्लेशापासुनि सोडीं तोडीं भवपाशा।। अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा।। नरहरि तल्लिन झाला पदपंकज लेशा ।।जय० ।।३।।

## प्रार्थना

घालीन लोटांगण वंदीन चरण।। डोळ्यांनि पाहिन रूप तुझे।। प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन।। भावें ओंवाळिन म्हणे नामा ।।१।। त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव।। त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वं मम देव देव ।।२।। कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा, बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् करोमि यद्यत् सकलं परस्मै, नारायणायेति समर्पयामि ।।३।। अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni
Galleria CHS., Plot No. 13, Sector 8,
Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir,
Deonar Mahanagarpalika Vasahat,
Govandi, Mumbai - 400043.

YouTube hariom astrologers
hariom astrologers
hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com